**<u>नोव्हेंबरमध्ये करावयाची शेतीची कामे</u>** **(पुणे जिल्हा**)–

**गहू** –

गव्हाची पेरणी करणेसाठी महिन्यातील संदेशाचा अवलंब करावा. पेरणीपुर्वी बियाण्यास थायरम अथवा कॅप्टन २.५ ग्रॅम प्रती किलो या बुरशीनाशकाची अधिक प्रती १० किलो बियाण्यास अँझोटोबॅक्टर किंवा अँझोस्पीरीलम आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणूचे प्रत्येकी २५० ग्रॅम चे एक पाकीट घेऊन बिजप्रक्रीया करावी. पेरणीसाठी खालील तक्त्याचा अवलंब करावा.

-बागायती गव्हास अर्धे नत्र, संपुर्ण स्फुरद व पालाश पेरणीचेवेळी द्यावे. उरलेले अर्धे नत्र पेरणीनंतर ३ आठवड्यांनी खुरपणीनंतर द्यावे.

जिरायत गहू पिकास संपुर्ण नत्र व स्फुरद पेरणीचेवेळी द्यावे.

**हरभरा** –

पेरणी - बागायती हरभरा पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी. पेरणीचे अंतर ३० बाय १० सें.मी. ठेवावे.

रासायनिक खत – २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद प्रति हेक्टरी पेरणीचे वेळी द्यावे.

बियाणे जाती - परत्वे ६० ते १०० किलो प्रतिहेक्टरी वापरावे.

सुधारीत वाण – विश्वास, फुले जी.१२, विजय, विशाल आणि श्वेता (काबुली) विराट (काबुली), विहार

बिजप्रक्रीया – प्रतिकिलो बियाण्यास २ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम कार्बेन्डँझीम यांची बिजप्रक्रीया करावी. तसेंच पेरणीपुर्वी बियाण्यास रायझोबियम व स्फुरद जिवाणूसंवर्धनाची २५० ग्रॅमचे प्रत्येकी एक पाकीट घेऊन प्रति १० किलो बियाण्यास बिजप्रक्रीया करावी.

तणनियंत्रण – मजूराअभावी खुरपणी करणे शक्य नसल्यास पेरणीपुर्वी तणनाशकाचा वापर करावा. यासाठी १.५ लिटर क्रीयाशील घटक फ्ल्युक्लोरॅलीन (बासालीन) किंवा १.५ लिटर पेंडामिथीलीन क्रीयाशील घटक (स्टॉम्प) ५०० लिटर पाण्यातून पेरणीपुर्वी जमिनीवर फवारून वखर पाळी घालावी म्हणजे ते जमिनीत चांगले मिसळले जाऊन तणाचे प्रमाण बरेच कमी होते.

तूषार सिंचन हरभरा पिकास वरदान –

शक्य असल्यास हरभरा पिकांसाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. हरभरा हे पीक पाण्यास अतिसंवेदनशिल आहे. जर गरजेपेक्षा अधिक पाणी दिले तर पीक उबळते व उत्पादनात

घट येते. तूषार सिंचन पध्दतीमुळे पिकास आवश्यक तेवढे व आवश्यक त्या वेळेला प्रमाणात पाणी देता येते.

**करडई** –

पेरणी झालेल्या पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच पुढीलपैकी एक किटकनाशक फवारावे.

एन्डोसल्फान – ३५ इ.सी. ७०० मिली किंवा

डायमेथोएट (रोगार) ३० इ.सी. ५०० मि.ली. किंवा

मॅलेथिऑन ५० इ.सी. १००० मि.ली.

५०० लिटर पाण्यातून फवारावे किंवा कार्बारील १० टक्के भुकटी अथवा क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी २० किलो प्रतिहेक्टरी धुरळावी. अथवा ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. क्रायसोपर्ला कार्नीयाच्या १० ते १५ हजार अळ्या प्रतिहेक्टरी पिकावर सोडाव्यात.

**पुर्वहंगामी ऊस लागवड** –

लागवड – १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यत करावी.

सुधारीत जाती – को,७४०, को,७२१९, (संजिवनी), को.८०१४(महालक्ष्मी), को,८६०३२ (निरा) को,९४०१२,

नांगरट करून जमीन चांगली तापू द्यावी. ढेकळे फोडून कुळवाच्या २-३ उभ्या आडव्या पाळ्या घेऊन जमीन तयार करावी. भारी जमिनीत १२० से.मी. व मध्यम जमिनीत १०० सें.मी. अंतरावर स-या पाडाव्यात. जमिनीच्या उताराप्रमाणे योग्य अंतरावर पाण्याचे पाट पाडावेत अगर ५ फुट अंतरावर पट्टा पध्दतीने किंवा २.५ – ५ किंवा ३ – ६ अशा जोडओळ पध्दतीने लागवड करणेसाठी स-या पाडाव्यात.

सरी पाडण्यापुर्वी हेक्टरी २० गाड्या चांगले कुजलेले शेणखत अगर कंपोस्ट खत कुळवाच्या पाळीने जमिनीत चांगले मिसळावे व सरी पाडल्यानंतर हेक्टरी २० गाड्या शेणखत अगर कंपोस्ट खत जमिनी सरीमध्ये टाकावे.

निंबोळी पेंडीचा वापर – निंबोळी पेंडीची बारीक भुकटी (३०० मेश) एक किलो व सहा किलो युरीया असे प्रमाण ठेवावे. निंबोळी पेंड व युरीया मिश्रणात थोडे पाणी शिंपडून मिश्रण चांगले मिसळावे म्हणजे निंबोळी पेंड युरीयाच्या कणावर चिकटून बसेल. निंबोळी पेंडीचा वापर नत्राच्या दुस-या व चौथ्या हप्त्याच्या वेळी करावा. निंबोळी पेंडीच्या वापरामुळे नत्र खतात बचत होऊन पिकास नत्र गरजेनुसार उपलब्ध होतो.

पूर्व हंगामी ऊसाची लागवड करताना रासायनिक खताचा पहिला हप्ता ३४.८५.८५ किलो

नत्र-स्फुरद-पालाश प्रति हेक्टरी द्यावे.

पूर्वी लागवड केलेल्या उभ्या ऊसातील खोडकीडीच्या नियंत्रणासाठी हेक्टरी ५ ट्रायकोकार्ड लावावेत. या उभ्या ऊसातील पांढ-या लोकरी माव्याच्या नियंत्रणासाठी एक मि.ली. एन्डोसल्फान + २ मि.ली. मेटॅसिस्टॉक प्रति लिटर पाण्यात अथवा २ मि.ली. कॉनफीडॉल प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे अथवा व्हर्टीसिलीयम जीवाणू ४ ग्रॅम प्रती लिटर पाण्यातून फवारावे. अथवा कोनोबात्राच्या २५०० अळ्या प्रतीहेक्टरी ऊसावर सोडाव्यात.

उसातील तणनियँत्रणासाठी – पिक चार महिन्याचे होईपर्यंत ३-५ खुरपण्या कराव्यात. दातेरी कोळप्याने २-३ कोळपण्या कराव्यात. तणाचा बंदोबस्त करण्यासाठी ऊस लागणीनंतर ४-५ दिवसांनी जमिनीत वापसा आलेनंतर ५ किलो अँट्राझीन (अँट्राटाफ) प्रती हेक्टरी १००० लिटर पाण्यात विरघळून संपूर्ण जमिनीवर फवारावे. फवारणी करताना फवारलेली जमीन तूडवू नये. तणांचे प्रमाण जास्त असल्यास ऊस लागणीनंतर २० ते २५ दिवसांनी २.४ डी (क्षार) दोन किलो प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात विरघळून तणावर फवारावे किंवा अँट्राझीन (अँट्रटाफ) ५ किलो अथवा मेट्रीब्युझीन (सेन्कॉर) १.५ किलो हेक्टरी १००० लिटर पाण्यात मिसळून उगवणीपुर्वी फवारून ६० दिवसांनी कोळपणी करावी अथवा वरीलप्रमाणे मेट्रीब्युझीन (सेन्कॉर) वापरून ४५ दिवसांनी ५ टन पाचटाचे आच्छादन करावे.

खोडवा पिकातील तण नियँत्रण करणेसाठी पॅराक्वॉट (ग्रामोक्झीन) २ लिटर ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी खोडवा उगवून आलेनंतर (चार आठवड्यांनी) तणांवर फवारणी करावी व हेक्टरी ५ टन पाचटाचे आच्छादन करावे. तणनाशक ऊसावर पडू देऊ नये.

**रब्बी सुर्यफुल** –

पेरणी – रब्बी सूर्यफुलाची पेरणी १५ नोव्हेंबर पर्यत करावी. पेरणीपुर्वी बियाण्यावर अँझोटोबॅक्टर व स्फुरद जीवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी.

सुधारीत व संकरीत जाती – मॉर्डेन, एस.एस.-५६, इ.सी.६८४१४, के.बी.एच.११, ए.पी.एस.एच.११, बी.एस.एच.-११.

रासायनिक खते – ६०.३०.३० किलो नत्र, स्फुरद पालाश प्रति हेक्टरी द्यावे. यापैकी ३० किलो नत्र, संपुर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्यावेळी दुचाडी पाभरीने पेरून द्यावे आणि उरलेले ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी पाण्याच्या पाळीपूर्वी द्यावे.

भात – पक्व झालेल्या भाताची कापणी वेळेवर करावी. कापणी करणेसाठी वैभव विळ्याचा

वापर करावा. जमिनीची नांगरट करावी. भाताची धसकटे व खाचरात पडलेला पेंढा गवत वेजून जाळून टाकावे.

**रब्बी ज्वारी** – बागायत रब्बी ज्वारीस राहीलेला ५० टक्के नत्राचा हप्ता पीक पेरणीनंतर ३० दिवसांनी द्या. पीक पहिले ३० ते ३५ दिवस कोळपण्या किंवा खुरपण्या देऊन तणमुक्त ठेवा. शक्य असलेस कोरडवाहू ज्वारीस आच्छादनांचा वापर करा. कोरडवाहू पिकात २ ते ३ वेळा आंतरमशागत करून जमिनीतील ओलावा टिकवून ठेवणेचा प्रयत्न करा.

**तूर** – तूरीवरील शेंगाचे नुकसान करणा-या पिसारी पतंग, शेंगावरील माशी व घाटेअळीच्या नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी करा.

१) एन्डोसल्फान ३५ इ.सी.१००० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ इ.सी. ८०० मि.ली. किंवा फोसेलॉन ३५ इ.सी. १००० मि.ली. किंवा फँथोएट ५० इ.सी. ७०० मि.ली. किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ डब्ल्यू.एस.सी.५५० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

२) शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी फेनव्हेलरेट २० ते २५ मि.ली. अधिक १०० लिटर पाणी यांची फवारणी करावी.

३) तुरीवरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी न्युक्ल्यर पॉली हैड्रासीस व्हायरसच्या रोगग्रस्त २५० अळ्यांची (LE/ha) पहिली फवारणी पीक फुलो-यात असताना करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारणी करावी.

४) निंबोळी अर्क ५ टक्केची फवारणी करावी.

**उद्यानविद्या -**

**आंबा** –

आंब्याला मोहोर फुटताच त्याचे संरक्षणासाठी किटकनाशकाची फवारणी किड व रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून करावी. फवारणीत १० लिटर पाण्यात ५० टक्के फँथोएट (प्रवाही) १० मि.ली. किंवा ३५ टक्के फोझेलॉन(प्रवाही) १५ मि.ली. किंवा २५ टक्के क्विनॉलफॉस (प्रवाही) २० मि.ली. चौथी फवारणी तिसरीनंतर दोन आठवड्यांनी करावी. किटकनाशके आलटून पालटून वापरावीत.

आंब्याच्या मोहोराची गळ होऊ नये म्हणून १० पी.पी.एम.एन.ए.ए. संजीवक फवारावे. त्यानंतर फळधारणा झाल्यावर ८ ते १० दिवसांनी ह्याच संजीवकाची दुसरी फवारणी करावी म्हणजे फळगळ थांबेल. कलमाच्या खोडावरील फुट काढावी.

**डाळींब** –

- नवीन लागण झालेल्या झाडांना काठ्यांचा आधार द्या.
- आंबेबहार धरण्यासाठी पाणी तोडावे.
- डाळींबावरील रोग व किडीचा बंदोबस्त करावा. बागेमध्ये झाडांखाली पडलेली रोगट, सडलेली फळे गोळा करून नायनाट करावीत.
- डाळींबावरील तेलकट डाग रोगाचा बंदोबस्त करणेसाठी माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २००५ या महिन्यात दिलेल्या संदेशाचे अवलंबन करावे.

**द्राक्षे** –

- द्राक्षाची वांझ फुट वेळीच काढावी.
- ऑक्टोबर छाटणीनंतर पुढीलप्रमाणे संजीवकाचा वापर करावा.
- उत्पादन व गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने गडलिंग ऑक्टोबर छाटणीनंतर घडात फळधारणा झाल्यावर लगेच करावे. गडलिंग करण्याअगोदर वेलीवरील सर्व फुटीचे शेंडे खुडण्यास विसरू नये.
- द्राक्षावरील केवडा, करपा व भुरी रोगाचे नियंत्रण करावे. करपा रोगाचे नियंत्रणासाठी ऑक्टोबर छाटणीनंतर बोर्डोमिश्रण ०.२ ते ०.४ टक्के किंवा कार्बेन्डॅझिम १०० ग्रॅम अथवा ब्लायटॉक्स २५० ग्रॅम यापैकी एकाची प्रति १०० लिटर पाण्यातून १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून फवारण्या कराव्यात.
- केवडा रोग नियंत्रणासाठी बोर्डोमिश्रण ०.२ ते ०.४ टक्के किंवा मेटॅलॅक्झील एम.झेड.-७२- २५० ग्रॅम यांची १० दिवसांच्या अंतराने प्रति १०० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

**पेरू** –

- मृग बहाराच्या फळाची काढणी चालू ठेवावी. ज्याठिकाणी आंबेबहार धरावयाचा असेल त्या बागेचे पाणी तोडावे.
- ज्या बागेतील पूर्वीच्या हंगामातील फळे संपली आहेत त्या बागा स्वच्छ करून झाडांना व्यवस्थीत आकार द्यावा.
- पेरूवरील फळकुजवा व देवी रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपिकोनाझोल ५०० ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम ५०० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब १२५० ग्रॅम यांची ५०० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ फवारण्या कराव्यात.

**बोर** –

- फळ पोखरणा-या अळीच्या बंदोबस्तासाठी कार्बारील ५० टक्के ४० ग्रॅम अथवा फेनव्हलरेट २० टक्के ५ मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के १० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून

फवारणी करावी. तसेच भुरी रोगाच्या बंदोबस्तासाठी डिनोकॅप १०० मि.ली. किंवा ट्रायडेमार्फ १०० मि.ली प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून ८-१० दिवसाचे अंतराने २-३ फवारण्या कराव्यात.

**अंजीर** –

- अंजिरावरील तांबेरा रोग नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनिल १००० ग्रॅम प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून दर १५ दिवसांचे अंतराने फवारावे. तुडतुडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी वरील औषधात डायमेथोएट ३० इ.सी. ५०० मि.ली. किंवा कार्बारील ५० डब्ल्यू. १ किलो मिसळावे.

**लिंबू** –

- हस्तबहार धरला असल्यास राहिलेला नत्राचा अर्धा हप्ता प्रतिझाड ४०० ग्रॅम द्यावा.
- लिंबावरील किड व खै-या रोगाचे नियंत्रणासाठी ५०० लिटर पाण्यात मोनोक्रोटोफॉस ३६ डब्ल्यू.एस. ७०० मि.ली. अथवा डायमेथोएट ३० इ.सी.८२५ मि.ली. अथवा मॅलेथिऑन ५० इ.सी. ७०० मि.ली. + स्ट्रीप्टोमायसीन ५० ग्रॅम व कॉपर ऑक्सीक्लोराईड १२५० ग्रॅम एकत्र मिसळून फवारावे. आवश्यकतेनुसार १५-१५ दिवसांच्या अंतराने ४ फवारण्या कराव्यात.

**भाजीपाला** -

**कांदा** –

- रब्बी कांद्याची पुनर्लागण तसेंच कांद्याची बियाण्यासाठीची लागवड पूर्ण करावी.
- रब्बी उन्हाळी कांद्याचे रोपासाठी बी पेरावे.

लसूण

- वरखतापैकी राहीलेली नत्राची मात्रा १/४ हेक्टरी २५ किलो द्यावी.
- फुलकिडे किंवा टाक्या किडीच्या नियंत्रणासाठी पाकळ्या उगवून आल्यानंतर हेक्टरी १० किलो थिमेट १० जी किंवा कार्बोफ्युरॉन १०जी ही किटकनाशके वाफ्यात टाकून द्यावीत. तसेंच दर १० ते १५ दिवसांनी डायमिथोएट १० मिली किंवा एन्डोसल्फान २० मि.ली. कींवा सायपरमेथ्रीन १० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. फवारणीच्या द्रावणात चिकट औषध मिसळावे.

**टोमेटो** –

- हेक्टरी २५ टन चांगले कुजलेले शेणखत पसरून जमीन उभी आडवी नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी.
- सरी वरंब्यावर ६० बाय ४५ से.मी. अंतरावर लागवड करावी. लागवडीपूर्वी वरखते हेक्टरी नत्र, स्फुरद व पालाश प्रत्येकी ५० किलो द्यावीत. पुनर्लागणीपूर्वी अँझोटोबॅक्टरची ५ पाकिटे प्रती ५० लिटर पाण्यातील द्रावणात बुडवून लागवड करावी.

**पानकोबी** –

- सपाट वाफ्यात ३० बाय ३० सें.मी. अंतरावर लागवड करावी.

- लागवडीपुर्वी रोपांची मुळे २ टक्के सुफला (१५.१५.१५) चे द्रावणात बुडवावीत.

- हेक्टरी ४० ते ५० बैलगाड्या भरखते वापरावे व लागवडीपुर्वी हेक्टरी नत्र, स्फुरद व पालाश प्रत्येकी ८० किलो द्या.

**फुलकोबी** –

- सटन डॅनिया व पुसा दिपाली या जातीची लागवड ४५ बाय ४५ सें.मी. अंतरावर सपाट वाफ्यात करावी.

- हेक्टरी ४० ते ५० बैलगाड्या भरखत द्यावे. वरखते लागवडीपुर्वी हेक्टरी नत्र, स्फुरद व पालाश प्रत्येकी ७५ किलो द्यावे.

**बटाटा** –

- हेक्टरी ५० किलो नत्राची दुसरी मात्रा देऊन पिकाला भर द्यावी.

**पालेभाजी -**

- पालक, मेथी, कोथिंबीर, चाकवत, राजगीरा, शेपू, लेट्यूस, इ. पालाभाज्यांची काढणी करावी.

**फुलझाडे** -

- शेवंतीची लागवड करून चार आठवडे झाल्यानंतर शेंडे खुडावेत

- गुलाबाची छाटणी पूर्ण करावी.

- अँस्टर, निशिगंध व ग्लँडीओलस यास हेक्टरी ५० किलो, १०० किलो व ६५ किलो नत्र अनुक्रमे द्या.

**पशु संवर्धन व दुग्धशास्त्र** -

१) खरीपातील काढणी केलेल्या चा-याची व्यवस्थीत साठवणूक करा.

२) सुबाभळमध्ये मायमोसीन व इतर सर्व झाडपाल्यामध्ये टॅनिन हे अपायकारक पदार्थ आहेत. प्रमाणापेक्षा जास्त झाडपाला खाऊ घातल्यास जनानरांच्या शरीरात अपायकारक पदार्थाचे प्रमाण वाढते, सुबाभळीचा पाला जास्त खाऊ घातल्यास जनावरांच्या अंगावरील केस गळून पडतात. यामुळे दिवसभरात खाऊ घातलेल्या चा-यात सुबाभळीच्या चा-याचे प्रमाण १/३ पेक्षा कमी ठेवा. त्यामुळे कोणतीही उपाय होत नाही.

३) रब्बी हंगामातील ओट या चारा पिकाची ३० सें.मी. अंतरावर पेरणी करा. पेरणीसाठी १०० कि.ग्रँ. प्रती हेक्टर बी वापरावे व पेरणीच्यावेळी हेक्टरी १०० कि.ग्रँ. व ५० कि.ग्रँ.

स्फुरद द्यावे. ओट पिकाच्या केंट, आर.ओ.१९ किंवा फुले हरीता या वाणांचा वापर करा. तसेच मका या चारापिकाची ३० सें.मी. अंतरावर पेरणी करा.. पेरणीसाठी हेक्टरी ७५ कि.ग्रॅ. बी वापरा व पेरणीच्यावेळी हेक्टरी १०० की.ग्रॅ. नत्र ५० कि.ग्रॅ. पालाश द्यावे. मका चारा पिकासाठी ऑफ्रीकन टॉल, मांजरी कंपोझीट, गंगा सफेद-२ या वाणांचा वापर करा.

४) लसूण घास व बरसीम या चारा पिकांची ३० सें.मी. अंतरावर पेरणी करा. पेरणीसाठी हेक्टरी २५ कि.ग्रॅ. बी वापरा, लसूण घासास पेरणीचेवेळी हेक्टरी १५ कि.ग्रॅ. नत्र, १५० कि.ग्रॅ. स्फुरद व ४० कि.ग्रॅ. पालाश द्या, तर बरसीम पिकास पेरणीचेवेळी १५ कि.ग्रॅ. नत्र, ९० कि.ग्रॅ. स्फुरद व ३०कि.ग्रॅ. पालाश द्या. लसूण घासाचे आर.एल. ८८, सिरसा-९, आनंद-२, आनंद-३ हे वाण पेरावेत. तसेंच बरसीम या चारा पिकाच्या वरदान-४, जे.बी.-१, मेस्काबी या वाणांची लागवड करावी.

**कृषि विज्ञान केंद्र**
**बारामती.**

**<u>Recommended field Operations to be carried out in the month of November</u> (Pune District)**

**Wheat** –

Use of calendar of operation provided in last month. Before sowing seed should be treated with thiram or captan 2.5 gm per Kg of seed + azotobacter or azospirilum and phosphorus solubiliziry bacterial culture @ 250 gm per 10 Kg of seed.

Provide the irrigated wheat with ½ N, total P2O5 and total K at the time of sowing. Remaining half Nitrogen should be given 3 weeks after sowing.

Dry land wheat should be provided with fertilizers total N and total P at sowing.

**Gram** –

Sowing – sowing of irrigated gram should be completed before 15$^{th}$ November. Spacing of 30 X 10 cm should be maintained

Fertilizer – provide 25 Kg N and 50 Kg P / ha. at the time of sowing .

Seed rate – 60 to100 kg / ha. depending on variety.

Improved Varieties – Vishwas, Phule-G-12, Vijay, Vishal and Shweta (Kabuli), Virat (Kabuli), Vishal.

Seed treatment –

Seed should be treated with 25gm thiram + 2 gm carbendazim. Likewise after this treatment seed should be treated with Rhizobium and P.S.B. @ 250gm each per 10 kg of Seed.

Weed control – If it is not possible to carryout weeding due to lack of labors use weedicides before sowing. For this purpose 1.5 liter ai fluchloralin (Basalin) or 1.5 liter Pendemethaline ai (Stamp) can be applied with mixing in 500 liters of water on soil before sowing. After application one light harrowing should be done to mix the herbicide in the soil.

Sprinkler a boon for gram -

If possible sprinkler system can be adopted for Gram. Gram is very sensitive to irrigation. More irrigation adversely affects the growth of crop and decreases yield. Sprinkler system provides adequate water to the crop and one can provide timely irrigation to the crop.

**Safflower** –

If aphid infestation seems on the crop spray any one of the following insecticides.

Endosulphan – 35 EC 700 ml/ or
Dimethoate – 30 EC 500 ml/ or
Malathion – 50 EC 1000ml dust
Mixed in 500 liters of water or dust carbaryl 10 % or Quinolphos 1.5 % powder @ 20 Kg per hectare. Or carry our spraying of Neem extract.
Release 10 -15 thousand larvae of crysoperla carnae per hectare.

**Preseasonal sugarcane planting** –
Planting – 15 Oct to 15 Nov.
Varieties – CO-740, CO-7219, CO-8014, (Mahalaxmi), C)-86032 (Nira), CO-94012.

Carryout ploughing of field and then keep the land open to the sunlight. Prepare the land by carrying out clod crushing and 2-3 harrowing. And prepare ridges and furrows with 120 cm spacing in heavy soil and with 100 cm in medium soil. Prepare irrigation channels at definite distance considering the slope of land or prepare the field for the planting with paired sow system in spacing either 2.5-5-2.5 or 3-6-3
Before opening the furrow add 20 bullock cart load well decomposed farm yard manure or compost and mix it uniformly in the soil. After opening furrow again apply 20 bullock cart load FYM of compost in the soil.

Use of Neem cake – Neem cake powder can be used with urea in the proportion of 1:6 Mix neemcake and urea uniformly by sprinkling some water on it. This will enable to stick the neemcake powder on urea particles. Neem cake should be used while applying second and fourth dose of urea. Use of neem cake helps in saving of Nitrogen and slow release of Nitrogen as per the need of crop.

First dose of chemical fertilizer should be given in the ratio of 34:84:85 N,P, K / ha. to the preseasonal sugarcane at the time of planting. Use trichocards at the rate of 5 per hectare to the existing plantation of sugarcane. To control the wooly aphids spray 1 ml endosulphan + 2ml metasystox mixed in one liter of water or 2 ml confidor mixed in 10 liters of water or 4 gm verticillium mixed in one liter of water or release 2500 larvae of conobathra per hectare sugarcane crop.

To control the weeds in ratoon crop spray paraquate (Gramoxone) 2 liters / ha. on weeds mixed in 500 liters of water, at one month after harvesting of the suru crop and 1./5 tons of sugarcane dried leaves can be used for mulching. weedicide should not be sprayed on sugarcane crop.

**Rabi Sunflower**:-
Complete the sowing of rabi sunflower crop by 15th of November. Treat the seeds with azotobacter and P.S.B. @ 250 gm for 10 Kg of seed.

Improved and hybrid varieties :- Norden, S.S.56, EC-68414, KBH-11, SPSH-11, BSH-11

Fertilizers – Apply 60:30:30 kg of NPK per hectare of crop out of total amount of nitrogen 50 Kg N and total P & K should be applied at the time of sowing with double bowl drill. Remaining 30 Kg of N should be applied at 30 days after sowing and before first irrigation.

**Paddy** –
Carry out harvesting of paddy at maturity. Use Vaibhav sickle for harvesting of paddy crop. Carryout ploughing and burnout stubbles, non-usable straw and grasses from the field.

**Rabi Jawar** –
Provide the irrigated Rabi Jawar with the remaining 50 % dose of N at 30 days after sowing. Keep your field weed free up to 30-35 days by executing weeding or hoeings. If possible use mulches for the dryland jawar. In dry land crop carryout 2-3 intercultivations to restore the moisture in the soil.

**Redgram** -
To control the borer complex of Redgram spray any of the following insecticide.

Endosulphan 35 EC 1000 ml or Quinolphos 25 EC 800 ml or Phoselone 35 EC 1000ml or Fanthoate 50 EC 700 ml or Monocrotophos 36 WAC 550 ml mixed in 500 liters of water.

To control the pod borer complex spray 250 LE HNPV / ha. first spraying should be done at the time of flowering. After this spray carryout spraying of endosulphan at 15 days interval @ 1000 ml mixed 500 liters of water for one hectare area.
Spray Neem extract 5 %.

**Mango** –
Immediately after flowering spray with proper insecticide if required to protect crop form pests and diseases. Spray with fanthoate 50 % EC @ 10 ml in 10 liter of water. Or phoselon 35 % EC @ 15ml of Quinolphos

25 % 20ml / 10 lit. water. Use these insecticides alternately as per requirement.
To control flower drop spray 10 PPM NAA (Napthalene Acetic Acid).
One more spray of NAA should be followed 8 to 10 days after fruit sets, it controls fruit drop. Remove excess growth on grafts.

**Pomegranate** :-
Stake the plants properly with sticks in newly planted orchard.
With held the crop from water, if you want to go for Ambe bahar.

Protect the crop form pest and diseases. Collect & destroy & all affected fruits, rotten fruit etc. from the orchard.

For control of oily disease follow the practices suggested in September and October 2005.

**Grapes** :-
Remove unwanted shoots from plants.
After October pruning use some growth regulators as follows.
Follow girdling Operations when fruit set starts after October pruning for qualitative as well as quantitative production. Cut all shoot tips before girdling.

For control of blast, Kevada and powdery mildew diseases spray with 0.2 to 0.4 % bordo mixture or 100 g. carbendazim on 250 g. blitox in 100 lit. water. Spray only one fungicide at a time, alternate sprays at 10 days interval gives effective control.

To protect crop from Kevada disease spray with 0.2 – 0.4 % bordo mixture or 250 gm dithane – 72 in 100 lit of water. Follow 2-3 sprays at an interval of 10 days as per requirement.

**Guava** :-
Complete harvesting of Mrig bahar fruits.
With held the orchard with water if want to go for Ambe bahar.
Those Orchard in which harvesting is over should be cleaned properly and trees should be pruned property.

To protect the crop from fruit rot and canker disease spray 3-4 the crop  with propiconazol 500 lit. of water. Give 3 to 4 sprays at an interval of 15 days.

**Ber** :-

For control of fruit borer spray with 50% carbaryl @ 40 gm or 20% Fenvelrate @ 5ml or 25% quinolphos @ 10 ml in 10 liter of water.
For powdery mildew spray with. Denocap 100 ml or Tridemorph 100 ml in 100 liter or water, follow 2-3 sprays at an interval of 8-10 days.

**Fig** :-
To control fig rust spray with chlorothalonyl 1000 gm in 500 liter of water at an interval of 15 days. For control of pests like jassids same spray should be followed by mixing dimethoate (30 EC) 500 ml or Carbaryl (50 WP) 1 Kg in it.

**Lime** –
If hasta bahar is followed, apply remaining half dose of Nitrogen i.e. 400 gm N/ tree.

To protect the crop from pests and disease spray with monocrotophos (36 WCS) 700 ml Or Dimethoate (30 EC) 825 ml or malathion (50 EC) 700 ml + Streptomycine 50 gm and cuper oxychloride 1250 gm in 500 liter of water. Apply 4-5 sprays at an interval of 15 days as per requirement.

**Vegetables:**-
**Onion**:-
Complete transplanting of Rabi Onion and planting of mother bulbs for seed-Production in this month.

Seed – sowing should be completed for nursery of late rabi or summer onion cultivation.

**Garlic** –
Top dress the remaining ¼ dose of N i.e. 25 kg N/ ha.
After germination of cloves it is very important to control thrips for that for that apply 10 kg thimet (10 g) or carbofuron (10 g) per hector. In addition to this spray dimethoate 10 ml or endosulphan 20 ml or cypermethrine 10 ml in 10 liter of water, alternate sprays should be followed at an interval of 10 to 15 days. Sticker be added in spray solution.

**Tomato** :-
Apply 25 tonns well rotten FYM / acre and prepare land by crosswise ploughing.

Transplant seedlings at spacing of 60 X 45 cm in ridges and furrows. Before transplanting give doses of Nitrogen, Phosphorus and potash,

50 kg each per hector also treat seeling with azotobacter biofertilizer @ 5 packets in 50 liter water.

**Cabbage** :-
Transplanting should be done at 30 X 30 cm spacing in flat beds.
Before transplanting dip seedlings in 2 % solution of sulpha (15:15:15)

Apply 40 to 50 cart loads of FYM / copost + 80 kg each, Nitrogen, phosphorus and potash / ha.

**Cauliflower** :-
Use varieties like saten Dania and puse deepali for planting by maintening spacing of 45 X 45 cm in flat beds.
Apply 40-50 C.L. FYM compost + 75 Kg each N.P. & K / hectare.

**Potato** :-
Apply second dose of Nitrogen i.e. 50 kg N / hectare.

**Leafy vegetables** :-
Harvest vegetable like Palak & Fenugreek, Coriander, Chakwat, Amaranthus, Shepu, Letuce etc.

**Flowers** :-
Planting of chrysanthemum should be done in this month.
Four weeks after planting follow detopping.
Complete cutting in Roses.
Aster, Tuberose and Gladiolus should be provided Nitrogen @ 50 Kg, 100 kg and 55 kg / hectare respectively

**Animal Husbandary and Dairy Science** :-
Properly store the fodder harvested in Kharif season
Reduce the quantity of Subabul leaves to 1/3 of total feed given to animal or less than that these leaves contains toxic substance known as Mymocine, which may cause toxic effect an animal health if given in excess quantity.

Sow Oat as rabi season fodder at 30 cm spacing. Use 100 kg seed for an area of hectare. Apply 100 kg N and 50 kg P / ha.

Use Oat varieties like kent, R-0-19 or Phule Harita for sowing.
Similarity sowing of Maize fodder should be followed at 30 cm distance by using 75 Kg / hectare seed rate. At the time of sowing apply 100 kg N & 50 kg K / ha. African tall, Manjari composite, Ganga Safed-2 etc. varieties of fodder Maize should be used.

Sowing of Lucern & Berseem should be done at 30 cm distance. Use seed rate of 25 kg / hectare for both fodders. Apply 15 kg N, 150 Kg P and 40 Kg K / hectare for Lucern and 15 kg N, 90 kg P and 30 kg K / hectare for Berseem at the time of sowing.

Use R-L-88, Sirsa-9, Anand-2, Anand-3 etc varieties of Lucern and Varldan-4, J-B-1, Meskabi etc varieties of Barseem.


**Krishi Vigyan Kendra,**

**Baramati.**

**Dist: Pune.**


**.............................................................................................**